# लॉकडाऊन नंतरचे वीज बिल ?

# वीज ग्राहकांच्या शंकेचे निरसन

माननीय वीज नियामक आयोगाने करोना महामारीच्या अनुषंगाने शासनातर्फे जाहीर करण्यात आलेल्या लॉकडाऊन च्या पार्श्वभूमीवर ग्राहकांची प्रत्यक्ष जागेवर जावून मीटर वाचन व वीज बिल वितरण न करण्यास महावितरण ला आदेश दिले होते. सदर बाबीची व्यापक जनजागृती महावितरण तर्फे करण्यात आली होती. ज्या ग्राहकांचे मोबाईल नंबर महावितरण कडे नोंदविलेले आहेत अश्या सर्व ग्राहकांना SMS द्वारे लॉकडाऊन काळात मीटर वाचन होणार नाही व छापील वीज बिल मिळणार नाही याची कल्पना देण्यात आली होती. तसेच वर्तमान पत्रांमध्ये या बाबत माहिती देण्यात आली होती. तसेच ज्या ग्राहकांना वास्तविक रिडिंग प्रमाणे वीज बिल हवे आहे अश्या ग्राहकांना महावितरण ने MOBILE APP तसेच PORTAL द्वारे पूर्वनिर्धारित तारखेला SELF READING सादर करण्याचे आवाहन केले होते. परंतु सदर आवाहनाला खूपच कमी प्रतिसाद लाभला. माहे मे -२०२० मध्ये एकूण २.३० कोटी ग्राहकांपैकी फक्त ३,६५,००० वीज ग्राहकांनी SELF READING सादर केले. तसेच ग्राहकांना लॉकडाऊन काळात वीज देयकावरील व्याज व विलंब आकाराचा भुर्दंड बसू नये म्हणून महावितरण ने मार्च – २०२० चे वीज बिल भरणा करण्याची मुदत दि.१५.०५.२०२० पर्यंत तसेच माहे एप्रिल २०२० चे वीज बिल भरणा करण्याची मुदत दि.३१.०५.२०२० पर्यंत वाढवून दिली आहे.

दि. १ जून २०२० पासून शासनातर्फे प्रतिबंधित क्षेत्र वगळून इतर भागात लॉकडाऊन मध्ये शिथिलता देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने महावितरण ने ग्राहकांना मिटर रिडींगनुसार वीज देयक देण्यासाठी १ जून २०२० पासून प्रतिबंधित क्षेत्र वगळून इतर ठिकाणी स्थानिक प्रशासनाच्या पूर्वपरवानगीने व शासनाने कोविड १९ संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे पालन करून मिटर रिडींग, वीज देयके वाटप तसेच वीज देयक संकलन केंद्रे पुन्हा सुरू केलेली आहेत.

लॉकडाऊनच्या काळात कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महावितरणने मिटर रिडींग व देयक वाटपाचे काम बंद ठेवल्याने एप्रिल व मे महिन्यात सरासरी वीज वापरानुसार व जून महिन्यात बऱ्याच ग्राहकांना मीटर रिडिंग वापरानुसार देयके देण्यात आली. तसेच महावितरणने लॉकडॉऊनच्या काळात देखील आपल्या ग्राहकांना मिटर रिडींगनुसार देयके मिळावीत म्हणून महावितरण मोबाईल अँप व्दारे रिडींग पाठविण्याचा पर्याय उपलब्ध करून दिलेला होता.

ज्यांनी या सुविधेचा लाभ घेतला त्यांना दरमहा रिडींग नुसार देयके देण्यात आलीत. परंतु बऱ्याच ग्राहकांनी या सुविधेचा लाभ न घेतल्याने त्यांना लॉकडॉऊनच्या काळात सरासरी वीज वापरानुसार बिलिंग करण्यात आले व जून महिन्यात मिटर रिडींग नुसार देयके दिल्याने ग्राहकांच्या मनात संभ्रम आहे की, १) महावितरणने ३ महिन्याचे एकत्र देयक दिले २) एकत्रित देयक देतांना मिळणारा स्लॅब बेनिफिट न मिळाल्याने वरच्या स्लॅबने वीज आकार लागला ज्यामुळे बिलाची रक्कम खुप जास्त आलेली आहे. ३) महावितरणने विजेचे दर आकारतांना ३१ मार्च २०२० पूर्वीच्या वापरलेल्या युनिटवर देखील १ एप्रिल २०२० पासून लागू झालेले वीज दर आकारलेले आहे. ४) सरासरी देयकाची रक्कम भरून देखील ३ महिन्याचे देयक देण्यात आलेले आहे व सरासरी प्रमाणे लावलेले युनिट्स गृहीत धरण्यात आलेले नाही आहेत आणि भरलेली रक्कम वजा करण्यात आलेली नाही.

वरील चार ही प्रश्नांची तपशीलवार माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे. तसेच घरगुती ग्राहकांना त्यांचे जून -२०२० चे वीज बिल कश्या प्रकारे आकारले आहे , हे पाहणे सुलभ होण्यासाठी महावितरण ने पुढील लिंक उपलब्ध करून दिलेली आहे. https://billcal.mahadiscom.in/consumerbill/

**प्रश्न क्र. १ ) महावितरणने ३ महिन्याचे एकत्र देयक दिले :**
**स्पष्टीकरण :**

सोबत दिलेल्या लिंक मध्ये दर्शिवलेले तक्ता व ग्राहकाचे जून महिन्याचे बिल पहिले असता ग्राहकास जुन महिन्याचे ३०७ युनिट चे रु. १४४४/- रक्कमेचे वीज बिल आकारलेले दिसत आहे. परंतु, सदर ३०७ युनिट वीज वापर हा फक्त जुन महिन्याचा नसून, तो एप्रिल , मे व जुन ह्या तीन महिन्यांचा आहे. जेव्हा केव्हा कुठल्याही कारणांमुळे महावितरण कडून ग्राहकांचे मिटर रिडींग घेणे शक्य होत नाही तेव्हा ग्राहकांना सरासरी वापराची देयके दिली जातात. हा सरासरी वापर ग्राहकाचा मागील तीन महिन्याचा नॉर्मल रीडिंगचा वापर लक्षात घेऊन निर्धारित केला जातो. लॉकडाऊन मुळे रिडींग घेणे बंद झाल्याने त्यानंतर निघालेली एप्रिल व मे महिन्यांची देयके ही सरासरी युनिटने देण्यात आलेली आहेत. देयकाची रक्कम जास्त दिसण्याचे एक कारण म्हणजे लॉकडॉऊनमुळे आलेली सरासरी देयके ही कमी सरासरी युनिटने (हिवाळयाच्या वापरावर) निघालेली आहेत आणि दुसऱ्या बाजूला घरगुती ग्राहकांच्या विजेच्या वापरात (उन्हाळयामुळे) वाढ झालेली आहे जी माहे जून २० च्या बिलात दिसून येत आहे. ग्राहकांनी आपल्या मागील वर्षीच्या एप्रिल, मे, जून या महिन्याच्या वापराची चालू वर्षीच्या लॉकडाऊन कालावधीतील या वापराशी तुलना केल्यास देयके बरोबर असल्याचे दिसून येईल. सोबतच्या देयकांचे उदाहरण घेतल्यास ग्राहकाला ३३ युनिट एवढे सरासरी वापराचे देयक एप्रिल आणि मे महिन्यात गेलेली आहे, व जून महिन्यात ३०७ युनिटचे रीडिंगनुसार ३.०७ महिन्याचे म्हणजेच ९२ दिवसाचे ( मागील रिडींग दिनांक ०३ मार्च ते चालू रिडींग दिनांक ०३ जून २०२०) देयक देण्यात आलेले आहे.

**प्रश्न क्र. २ ) एकत्रित देयक देतांना मिळणारा स्लॅब बेनिफिट न मिळाल्याने वरच्या स्लॅबने वीज आकार लागला ज्यामुळे बिलाची रक्कम खुप जास्त आलेली आहे.**
**स्पष्टीकरण :**

ग्राहकाला वीज देयक जेव्हा एक महिन्यापेक्षा अधिक कालावधीकरिता दिले जाते तेव्हा देयकाचे एकूण युनिट देखील तेवढ्या महिन्यात विभागून दिले जातात. सोबत दिलेल्या लिंक मधील वीज आकार तक्ता पाहिल्यास ग्राहकाला ३०७ युनिट चे जे वीज देयक देण्यात आले आहे ते ९२ दिवसाचे म्हणजेच ३.०७ महिन्याचे ( मागील रिडींग दिनांक ०३ मार्च ते चालू रिडींग दिनांक ०३ जून २०२०) असून ३०७ युनिट भागीला ३.०७ महिने म्हणजे एका महिन्याला १०० युनिट वापर झाला असे गृहीत धरून, ३०७ युनिट करिता वरचा स्लॅब न लागता पहिलाच स्लॅब लागलेला दिसुन येईल. देयकामध्ये जरी ३०७ युनिटची एकत्रित रक्कम असली तरी ग्राहकाला १०० युनिटच्यावरील दुसरा किंवा तिसरा स्लॅब लागलेला नाही.कारण एकूण युनिट भागिला एकूण महिने याप्रकारे महिन्याला १०० युनिटचा वापर याप्रमाणे देयकाची रक्कम काढलेली आहे.

**प्रश्न क्र. ३ ) महावितरणने विजेचे दर आकारतांना ३१ मार्च २०२० पूर्वीच्या वापरलेल्या युनिटवर देखील १ एप्रिल २०२० पासून लागू झालेले वीज दर आकारलेले आहे.**
**स्पष्टीकरण :**

महावितरणची बिलिंग प्रणाली हि पूर्णपणे संगणीकृत आहे. सोबत दिलेल्या लिंक मधील वीज आकार तक्ता पाहिल्यास ३१ मार्च २०२० पर्यंतच्या वापराचे युनिट हे स्वतंत्र दाखवण्यात आलेले आहेत व त्यांच्याकरिता मा. वीज आयोगाने निर्धारित केलेला जुने दर आकारण्यात आलेला आहे. महावितरणने ३१ मार्च २०२० च्या आधीच्या वापरावर जुन्याच दराने आकारणी केलेली आहे. तसेच ९५ युनिट वापर हा ३१ मार्च पूर्वीचा असून त्यांना जुनाच दर लावलेला आहे.

**प्रश्न क्र. ४ ) सरासरी देयकाची रक्कम भरून देखील ३ महिन्याचे देयक देण्यात आलेले आहे व सरासरी प्रमाणे लावलेले युनिट्स गृहीत धरण्यात आलेले नाही आहेत आणि भरलेली रक्कम वजा करण्यात आलेली नाही.**

**स्पष्टीकरण :**

माहे जून २० चे देयक ३.०७ महिन्याचे दिसत आहे पण त्यामधून एप्रिल व मे या दोन महिन्याच्या सरासरी देयकाची रक्कम ही वजा सरासरी देयकाची रक्कम या शीर्षकाखाली वजा करण्यात आलेली आहे. ही रक्कम वजा करतांना स्थिर आकाराची रक्कम व त्यावरील वीज शुल्क एवढी रक्कम वगळून इतर सर्व रक्कम वजा केली जाते. जी आपल्याला वजा सरासरी देयकाची रक्कम या तक्त्यावरून दिसून येईल. स्थिर आकाराची रक्कम व त्यावरील वीज शुल्क वजा होत नसल्याने ग्राहकांच्या मनात प्रश्न निर्माण होतो. सदर रक्कम वजा न करण्याचे कारण जून २० चे देयक जरी ३ महिन्याचे असले तरी स्थिर आकार हा एकाच महिन्याचा लावलेला असतो. इतर आकाराप्रमाणे स्थिर आकाराची रकम ही ३ महिन्याची एकत्रित न आकारल्याने ती रक्कम वजा केली जात नाही. काही ग्राहकांना प्रश्न असतो की नॉर्मल रिडींगच्या बिलातून सरासरी युनिट वजा केले जात नाहीत व त्यामुळे त्यांचे नुकसान होते, तर बिलिंग प्रणालीनुसार सरासरी देयकांचे युनिट वजा न करता तेवढ्या युनिट करिता आकारण्यात आलेली रक्कम वजा केली जाते. हिवाळयाच्या वापरानुसार निघालेली कमी सरासरी युनिटची देयके, लॉक डाऊन तसेच उन्हाळयामुळे वाढलेला घरगुती वापर व १ एप्रिल २० पासून लागू झालेले नवीन दर ह्या सर्व बाबी एकत्रित आल्यामुळे वीज देयकाची रक्कम जास्त वाटू शकते. परंतु दाखवलेली देयके आणि त्याचे विश्लेषण करणारे तक्ते बघितले असता महावितरण कडून देण्यात आलेली देयके ही अचूक असून अधिक पारदर्शी आहे हे दिसून येते.

तसेच जर ग्राहकाने लॉकडाऊन काळात वीज देयक भरले असेल , तर सदरची रक्कम माहे जुन – २०२० च्या वीज देयकामधून वजा केलेली आहे.

या द्वारे महावितरण च्या घरगुती ग्राहकांना आवाहन करण्यात येते कि वर दिलेल्या लिंक चा वापर करून जुन – २० मध्ये आपल्या बिलाची आकारणी कश्या प्रकारे करण्यात आली आहे याची पडताळणी करावी.

तरी वीज ग्राहकांनी वीज बिल भरणा करून महावितरण कंपनीस सहकार्य करावे असे महावितरण तर्फे आवाहन करण्यात येत आहे.

मा. वीज नियामक आयोगाव्दारे निर्धारित केलेले वीज दर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Tariff upto 31.03.2020 | LT I Res 1-Phase | युनिट | 0-100 | 101-300 | 301-500 | 501-1000 | >1000 |
| | A) स्थिर आकार रु. 90 | वीज आकार(रु.) | 3.05 | 6.95 | 9.9 | 11.5 | 12.5 |
| Tariff from 01.04.2020 | A) स्थिर आकार रु. 100 (10 Rs add. for Municipal Corp Area) | वीज आकार(रु.) | 3.46 | 7.43 | 10.32 | 11.71 | 11.71 |

| CONSUMER NO. 410016926161 | | | |
|---|---|---|---|
| TARIFF :- 090 /LT-I (B) Residential 1Ph | | | |
| Bill for the Month | APR 20 | MAY 20 | JUN 20 |
| Previous Reading | 12263 | 12263 | 12263 |
| Previous Reading Date | 03-03-20 | 18-04-20 | 03-03-20 |
| Current Reading | RNA | RNA | 12570 |
| Current Reading Date | | | 03-06-20 |
| UNITS | 33 | 33 | 307 |
| STATUS | RNA | RNA | NORMAL |
| Bill Period Months | 1 | 1 | 3.07 |
| A) स्थिर आकार (per Month) | 90.00 | 110.00 | 110.00 |
| B) वीज आकार | 100.65 | 114.18 | 1027.17 |
| C) वहन आकार (per unit) | 42.24 | 47.85 | 429.00 |
| D) इंधन समायोजन आकार (Slab Wise) | 16.50 | 0.00 | 0.00 |
| E) वीज शुल्क 16% of (A+B+C+D) | 39.90 | 43.52 | 250.59 |
| F) वीज विक्री कर | 0.00 | 0.00 | 0.00 |
| G) वजा सरासरी देयकाची रक्कम | 0.00 | 0.00 | 372.85 |
| H) व्याज | 0.00 | 0.00 | 0.00 |
| I) इतर आकार | 0.00 | 0.00 | 0.00 |
| **चालू वीज देयक(रु.) sum of (A+B+C+D+E+F+H+I-G)** | **289.29** | **315.55** | **1443.91** |

**A) स्थिर आकार (per Month)**

| | APR 20 | MAY 20 | JUN 20 |
|---|---|---|---|
| Per Month | 90 | 110 | 110 |

**B) वीज आकार**

| | APR 20 | MAY 20 | JUN 20 |
|---|---|---|---|
| Units | 33 | 33 | 307 |
| Rate | 3.05 | 3.46 | See below chart for details |
| Amount | 100.65 | 114.18 | |

**Bill Period:3.07 Month(s) /Old Units upto 31-03-2020 = 95**

**वीज आकार JUN 20**

| | | | |
|---|---|---|---|
| BILL PERIOD IN MONTHS | 0.94 | 1 ST SLAB 100 UNITS FOR 31 DAYS HENCE 94 UNITS FOR 29 DAYS (03-03 to 31-03= 29 Days) | |
| | UNITS | RATE | AMOUNT |
| OLD | 95 | | |
| 1ST SLAB (29*100/31) | 94 | 3.05 | 286.70 |
| 2ND SLAB | 1 | 6.95 | 6.95 |
| **TOTAL (A)** | | | **293.65** |
| NEW | 212 | | |
| 1ST SLAB | 212 | 3.46 | 733.52 |
| **TOTAL (B)** | | | **733.52** |
| **TOTAL ENERGY CHARGES (A)+ (B)** | **307** | | **1027.17** |

**F) वीज विक्री कर**

घरगुती ग्राहकांकरीता लागू नाही

**C) वहन आकार (per unit)**

| | APR 20 | MAY 20 | JUN 20 | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | Old Unit | Current Year | Total |
| UNITS | 33 | 33 | 95 | 212 | 307 |
| RATE PER UNIT | 1.28 | 1.45 | 1.28 | 1.45 | 2.73 |
| TOTAL | 42.24 | 47.85 | 121.6 | 307.4 | 429 |

**D) इंधन समायोजन आकार (Slab Wise)**

| | APR 20 | MAY 20 | JUN 20 | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | Old Unit | Current Year | Total |
| UNITS | 33 | 33 | 95 | 212 | 307 |
| Rate | 0.5 | 0 | 0 | 0 | 0 |
| **TOTAL** | **16.5** | **0** | **0** | **0** | **0** |

**E) वीज शुल्क 16% of (A+B+C+D)**

| | APR 20 | MAY 20 | JUN 20 |
|---|---|---|---|
| A) स्थिर आकार (per Month) | 90.00 | 110.00 | 110.00 |
| B) वीज आकार | 100.65 | 114.18 | 1027.17 |
| C) वहन आकार (per unit) | 42.24 | 47.85 | 429.00 |
| D) इंधन समायोजन आकार (Slab Wise) | 16.50 | 0.00 | 0.00 |
| Total | 249.39 | 272.03 | 1566.17 |
| **16% of Total** | **39.90** | **43.52** | **250.59** |

**G) वजा सरासरी देयकाची रक्कम**

| | APR 20 | MAY 20 | TOTAL |
|---|---|---|---|
| B) वीज आकार | 100.65 | 114.18 | 214.83 |
| C) वहन आकार (per unit) | 42.24 | 47.85 | 90.09 |
| D) इंधन समायोजन आकार | 16.50 | 0.00 | 16.50 |
| वीज शुल्क 16% of (B+C+D) | 25.52 | 25.92 | 51.43 |
| **TOTAL** | **184.91** | **187.95** | **372.85** |

Scanned with CamScanner